Theme of the Special Issue
Dr.Babasaheb Ambedkar : An Architect of India (Special Issue No.84) | ISSN 2349-638x Impact Factor 7.149 | 14 th April 2021

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार

**प्रा.एन.ए.पाटील**

( राज्यशास्त्र विभाग)
महात्मा गांधी विद्यामंदीर संचालित,
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
मनमाड ,जिल्हा - नाशिक

**सारांश :-**

*आधुनिक भारताच्या जडण-घडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अतिशय महत्वाचे राहिलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील परंपरागत मनुवादी राजकीय व्यवस्थेला छेद देऊन एक नवी समता ,स्वातंत्र्य ,न्याय व बंधुता या तत्वावर आधारलेली लोकशाहीवादी नवी व्यवस्था भारतात निर्माण करण्याचे क्रांतिकारक कार्य केले. त्यामुळे भारताची जगामध्ये एक सर्वात मोठे लोकशाहीवादी राष्ट्र म्हणून नवी ओळख निर्माण झाली.*

*डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, रक्ताचा एकही थेंब न सांडता राजकीय व सामाजिक जीवनात क्रांतिकारक बदल घडवून आणणे म्हणजे लोकशाही होय. भारतीय समाजात अहिंसात्मक मार्गाने क्रांतिकारक बदल घडवून आणण्यासाठी लोकशाही हाच सर्वोत्तम मार्ग आहे. यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ठाम विश्वास होता .*

*डॉ. आंबेडकरांनी संसदीय व अध्यक्षीय या लोकशाहीतील शासन प्रकाराचे प्रामुख्याने समर्थन केले आहे .परंतु असे असले तरी संसदीय शासन पद्धती ही व्यक्ती व समाज या दोघांच्या हिताच्या दृष्टीने सर्वोत्तम पद्धती आहे .असे त्यांचे मत होते तर अध्यक्ष लोकशाही शासन प्रकारात लोकांच्या संघटित आकांक्षाचे प्रतिनिधित्व देण्यात आलेले असते. त्यामुळे असे शासन हे सामर्थ्यवान आणि कार्यक्षम शासन असते असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते.*

*आधुनिक काळामध्ये राज्य ही अत्यावश्यक संस्था असून त्या मार्फत जास्तीत जास्त लोकांचे कल्याण करून त्यांच्या सामाजिक व राजकीय जीवनात क्रांतिकारक बदल घडवून आणण्याचे कार्य राज्य संस्थेमार्फत करणे गरजेचे आहे असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.*

**प्रस्तावना :-**

आधुनिक भारताच्या जडणघडणीत ज्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे भारताची ज्यांच्यामुळे जगात एक नवी वेगळी ओळख निर्माण झाली आहे. आणि भारतातील हजारो वर्षात पासून दबलेल्यांचा यांचा आवाज बनून ज्यांनी लाखो कुळांचा उद्धार केला आहे ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. विदेशात उच्च शिक्षण घेऊन भारतात परत आल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजकीय व सामाजिक कार्यात सहभाग घेऊन दिनदलितांना न्याय देण्याचे महान काम डॉ. आंबेडकरांनी केले.

भारतामध्ये जी राजकीय व्यवस्था हजारो वर्षापासून होती तिच्यावर कमी अधिक प्रमाणावर मनुवादी विचारांचा प्रभाव होता.या प्रवाहातून जी राजकीय व्यवस्था अस्तित्वात आली त्यात दिनदलितांना समतेची वागणूक देण्यात आली नव्हती.या समाजव्यवस्थेतील गुलामगिरी विरुद्ध महात्मा ज्योतिबा फुले यांनी आवाज उठविला आणि समता स्वातंत्र्य व न्याय अशा नव्या समाज मूल्यांवर आधारित नवी समाजरचना निर्माण